# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.04.2024** **वार:शनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यात सुमारे 60 टक्के मतदान
2. उर्वरित टप्प्यांसाठी प्रचार आता शिगेला; पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात जाहीर सभा
3. व्हीव्हीपॅट यंत्रांच्या शंभर टक्के पडताळणीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आणि
4. कोकणात आज हवामान कोरडं आणि दमट तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता

**मतदान**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातलं मतदान काल काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडलं. काल संध्याकाळी 6 वाजेपर्यंत सरासरी 59 पूर्णांक 63 शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक यंत्रणेनं कळवलं आहे. बुलडाण्यात 58 पूर्णांक 45, अकोला इथं सुमारे 58 टक्के, अमरावतीमध्ये 60 पूर्णांक 74 टक्के, वर्धा इथं 62 पूर्णांक 65 टक्के, यवतमाळ-वाशिममध्ये 57 टक्के, हिंगोलीमध्ये 60 पूर्णांक 79, नांदेडमध्ये 59 पूर्णांक 57, तर परभणी मतदारसंघात सुमारे 60 टक्के मतदानाची नोंद झाली.

उन्हाची तीव्रता आणि लग्नाचा मुहूर्त असूनही अनेक ठिकाणी मतदानाचा उत्साह दिसून येत होता. सर्वच मतदान केंद्रांवर मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अकोल्यात मतदान केलेल्या नागरीकांना एका खानावळीमध्ये तसंच एका केशकर्तनालयात सवलत देण्यात आली. अकोल्यातच एका डॉक्टरांनी मतदान केलेल्यांना उष्माघात प्रतिबंधक औषधं मोफत दिली. नांदेडमध्ये गुजराथी हायस्कूलमधल्या महिला कर्मचाऱ्यांनी संचलित केलेल्या मतदान केंद्रावर फूल देऊन कर्मचाऱ्यांनी मतदारांचे स्वागत केलं. यवतमाळमध्ये एका मतदान केंद्रावर दिव्यांग बांधवांनी झाडाचं रोप देऊन मतदारांचं स्वागत केलं. वाशिम जिल्ह्यातल्या चेतन सेवांकुरच्या दृष्टीबाधित दिव्यांग मतदारांनी ब्रेल चिठ्ठी आणि सहायकाच्या मदतीनं आयुष्यात पहिल्यांदाच मतदान केलं. वाशिम नगरपालिकेच्या घंटागाडीनं मतदारांना मतदानासाठी बाहेर पडण्याचं आवाहन केलं. नवमतदार तसंच वयोवृद्ध मतदारांनीही आपलं मतदानाचं कर्तव्य बजावलं.

**मतदान-बुलडाणा**

एकंदरीतच लोकशाहीच्या या पर्वात निवडणूक यंत्रणा, मतदार आणि सर्वच घटकांनी आपली जबाबदारी चोख पार पाडत योगदान दिलं. बुलडाणा जिल्ह्यातील हे प्रेरक उदाहरण.......

**बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनानं जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी राबवलेले उपक्रम आणि निवडणूकीच्या कामाबाबत कर्मचाऱ्याना दिलेल्या प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम मतदानावर झाल्याचं दिसून आलं. प्रत्येकानं आपलं मतदानाचं कर्तव्य करावं, लग्न मुहूर्त असला नवपरिणीत जोडपं आणि सर्व वऱ्हाडी मंडळींनीही आवर्जून मतदान करावं असं आवाहन निवडणूक यंत्रणेनं सातत्यानं केलं होतं. त्याला प्रतिसाद देत प्रतीक्षा आणि संदीप या नवपरिणीत जोडप्यानं लग्नात मतदानाबाबत जनजागृती केली; त्यामुळे जिल्ह्यातल्या अनेक वधू वरांनी**

**लग्न बोहल्यावर चढण्यापूर्वी मतदान केलं. वऱ्हाडी मंडळींनीही लग्न समारंभाबरोबरच लोकशाहीच्या उत्सवात सहभाग घेत आपला मतदानाचा हक्क बजावला. तर दुसरीकडे जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे इथल्या मतदान केंद्रावर वादळी वाऱ्यामुळे मतदान केंन्द्रावरील पत्रे उडून जाऊन लाकडी खांब पडले. या दुर्घटनेत कर्मचारी गजानन वानखडे हे जखमी झाले; मात्र त्यांनी मतदान यंत्र सुरक्षित ठेवून आपली कर्तव्यतत्परता दाखवून दिली. बुलडाणा जिल्ह्यातली ही दोन्ही उदाहरणं खरोखरच स्तुत्य आणि अनुकरणीय आहेत.आकाशवाणी बातम्यांसाठी बुलडाण्याहून सचिन ठाकरे.**

**गृहमतदान-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर आणि माढा मतदारसंघात येत्या 7 मे रोजी मतदान होणार आहे. तत्पुर्वी वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली जात आहे. काल पहिल्याच दिवशी सोलापूर लोकसभेसाठी 606 तर माढा लोकसभेसाठी 609 मतदारांनी गृह मतदानाद्वारे आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

**छाननी**

लोकसभा निवडणूकीच्या चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. या टप्प्यात राज्यातील 11 मतदारसंघात 447 उमेदवारांचे 618 अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर 369 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. चौथ्या टप्प्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड लोकसभा मतदारसंघात 13 मे रोजी मतदान होणार आहे.

**प्रचार-रत्नागिरी, रायगड, अहमदनगर**

लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांसाठी प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात जाहीर सभा होणार आहे. तपोवन मैदानावर संध्याकाळी पाच वाजता ही सभा होईल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूरमध्ये नारायण राणे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. या वेळचं मतदान हे भाजपासाठी नसून, भारताला सर्वोच्च पदावर पोहोचवण्यासाठी असल्याचं ते म्हणाले. फडणवीस यांनी काल पेणमध्येही महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल शिर्डीमध्ये शिवसेनेचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांची बैठक घेतली. लोकसभेच्या निवडणुकीचा दुसरा टप्पा होत असताना भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांची घाबरगुंडी उडाली आहे, त्यामुळे ते काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर, खालच्या पातळीवर येऊन टीका करत आहेत, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे त्यांच्यावर टीका होत आहे, असं त्यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**व्हीव्हीपॅट**

व्हीव्हीपॅट यंत्रांच्या सर्व चिठ्ठयांची म्हणजेच शंभर टक्के पडताळणी करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळली. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या पीठानं हा निर्णय दिला. निवडणूक आयोगानं दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारावर न्यायालयानं हा निर्णय दिला. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले. त्यानुसार EVM मध्ये चिन्ह लोड करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, चिन्ह लोड करणारं युनिट सीलबंद करावं आणि सुरक्षित ठिकाणी ठेवावं, तसंच निकाल जाहीर झाल्यानंतर किमान 45 दिवस ईव्हीएमसह सीलबंद कंटेनर सुरक्षित ठिकाणी ठेवावेत, त्याशिवाय, निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत उमेदवारांना संबंधित ईव्हीएमची पूर्ण चाचपणी करण्याची मागणी करण्याचा अधिकार असेल. तज्ज्ञ अभियंत्यांच्या पथकामार्फत ही तपासणी करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले.

**अर्जदाखल-मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. या टप्प्यात 3 मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या 13 मतदारसंघांचा समावेश आहे. मुंबईतले सर्व 6 मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी,

पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांत या टप्प्यात मतदान होणार आहे. ईशान्य मुंबईतले भाजपा उमेदवार मिहिर कोटेचा यांनी काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. नाशिक लोकसभा मतदारसंघातून बाबाजी भक्त परीवाराचे शांतीगिरी महाराज यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. दिंडोरीतून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार जीवा पांडू गावित आणि सुभाष रामू चौधरी यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केले. पालघरमधून बहुजन विकास आघाडीचे उमेदवार म्हणून राजेश पाटील यांनी काल अर्ज भरला.

**<u>ललितकेंद्र-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग जिल्हयातल्या कुडाळचा सांस्कृतिक वारसा समृद्ध करणारे साहित्यिक दिवंगत चिं त्र्यं खानोलकर उर्फ आरती प्रभू आणि प्रसिद्ध संगीतकार वसंत देसाई यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच कायम स्मरण राहण्यासाठी क. म. शि .प्र. मंडळाच्या वतीन चिं. त्र्यं. खानोलकर ललित कला केंद्र आणि वसंत देसाई मुक्तावकाश रंगमंच उभारण्यात आला आहे. या वस्तूचा उदघाटन सोहळा काल आरती प्रभू यांच्या स्मृतिदिनी सुप्रसिद्ध नाट्यकार शफाअत खान यांच्या हस्ते झाला. या ललित कला केंद्रात नृत्य, नाट्य संगीत तसेच चित्रकला शिल्पकला यासारख्या ललित कलांच्या शिक्षणाची सोय होणार आहे.

**<u>फ्लेमिंगो-नवीमुंबई</u>**

नवी मुंबईतल्या सीवूडस परिसरात पाम बीच मार्गालगत असणाऱ्या तलाव परिसरात गेल्या गुरूवारी 5 फ्लेमिंगो अर्थात रोहित पक्षांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपसंचालक डॉ. राहुल खोत, यांच्यासह अन्य तज्ञांनी या तलाव परिसराची काल पाहणी केली. तलावात साचलेल्या गाळात अडकल्यामुळे तसंच पथदिवे बदलल्यामुळे पक्ष्यांची दिशाभूल झाली असावी आणि त्यामुळे काही पक्षी पहाटे रस्त्यावर उतरले असावेत अशी प्राथमिक शक्यता असल्याची माहिती बीएनएचएससचे डॉ. खोत यांनी यावेळी दिली. हे सर्व तज्ञ आपला अहवाल, मॅन्ग्रोव्ह सेलचे प्रमुख आणि अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक व्ही एस रामाराव यांना सादर करणार आहेत.

**<u>अपघात-पालघर</u>**

पालघर जिल्ह्यातल्या वाड्यामध्ये वाडा- भिवंडी महामार्गावर काल झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. मद्यधुंद टेम्पो चालकानं दुचाकीस्वारांना धडक दिल्याने हा अपघात झाल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

कोकणात आज हवामान कोरडं, उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचीही शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून काही ठिकाणी मेघगर्जनेसह वीजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.